# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि भारत मौसम विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**फोन नं.: (०२३५८) २८२३८७/ ८१४९४६७४०१** **ई-मेल: dpl.amfu@gmail.com**

**अंक ०६/२०२२** **दिनांक : २१ जानेवारी, २०२२** **कालावधी ५ दिवस**


| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| **मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १५/०१/२०२२ ते २१/०१/२०२२)** | | | | | | | **हवामानाचे घटक** | **हवामान पूर्वानुमान (दिनांक २२/०१/२०२२ ते २६/०१/२०२२)** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (स्त्रोत: स्वयंमचलीत कृषि हवामान केंद्र, कर्जत) | | | | | | | | (स्त्रोत: प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई) | | | | |
| **१५/०१** | **१६/०१** | **१७/०१** | **१८/०१** | **१९/०१** | **२०/०१** | **२१/०१** | | **२२/०१** | **२३/०१** | **२४/०१** | **२५/०१** | **२६/०१** |
| ०.० | ०.० | ०.० | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ० | ३ | ० | ० | ० |
| ३३.९ | ३४.६ | ३५.७ | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से) | २७ | २७ | २६ | २७ | ३० |
| १७.१ | १६.२ | १९.५ | - | - | - | - | किमान तापमान (अं.से) | १९ | १७ | १५ | १६ | १७ |
| - | - | - | - | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | निरभ्र | अंशत: ढगाळ | निरभ्र | निरभ्र | निरभ्र |
| ९३ | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ८६ | ८६ | ७८ | ६१ | ४६ |
| ६७ | ६८ | ६७ | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ३५ | ५३ | ४४ | २४ | २१ |
| १.० | ०.० | ०.० | - | - | - | - | वाऱ्याचा वेग(किमी/तास) | ३ | १० | ५ | ७ | ५ |
| आ.पू. | वा.ऊ. | ई. | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | आ. | ई. | ई.पू. | ई.पू. | ई.पू. |

| **पाऊस (मिमी) मागील आठवड्यातील** | **पाऊस (मिमी) १/१/२०२२ पासून आजपर्यंत** | **पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा** |
|---|---|---|
| **०.०** | **२०.०** | **-** |

## हवामान सारांश /इशारा

| | |
|---|---|
| **हवामान अंदाज** | **प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार रायगड जिल्ह्यामध्ये दि. २२ ते २३ जानेवारी, २०२२ दरम्यान आकाश अंशत: ढगाळ राहून तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता वर्तविण्यात आली असून कमाल आणि किमान तापमानात क्रमश: घट होण्याची शक्यता आहे.** |
| **विस्तारित श्रेणी अंदाज** | **विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) कोकण विभागात दिनांक २६ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२२ दरम्यान हवामान कोरडे राहून कमाल आणि किमान तापमान हे सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.** |

## हवामान अंदाजावर आधारीत कृषि सल्ला

| **पिक** | **अवस्था** | **कृषि सल्ला** |
|---|---|---|
| **सामान्य सल्ला** | -- | • दिनांक २२ ते २३ जानेवारी, २०२२ दरम्यान हलक्या पाऊसाची शक्यता असल्याने काढणी केलेली हळद, काळीमिरी, सुपारी वाळविण्यासाठी सुरक्षित ठिकाणी पसरून ठेवावी. |
| **विशेष सल्ला** | -- | • किमान तापमानात घट संभवत असल्याने रात्रीच्या वेळेस कोंबड्यांच्या शेड मध्ये गरजेनुसार विजेचे बल्ब लावावेत आणि शेडभोवती पडदे गुंडाळावे. |
| **रब्बी उन्हाळी भात** | रोप अवस्था | • भाताची रोपे ३५ ते ४० दिवसांची झाली असल्यास पुर्नलागवड करावी. पुर्नलागवड करावयाच्या खाचरामध्ये चिखलणी करावी. चिखलणीच्या वेळेस ८७० ग्रॅम युरिया, ३१३० ग्रॅम सिंगल सुपर फोस्फेट आणि ८४० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटश प्रती गुंठा खते मिसळावीत. सुफला (१५:१५:१५) द्वारे खते द्यावयाची असल्यास प्रती गुंठा ३ किलो मात्रा द्यावी. पुर्नलागवडीसाठी भाताची १२ ते १५ सें.मी. उंचीची पाच ते सहा पाने फुटलेली रोपे वापरावीत. पुर्नलागवड २० X १५ सें.मी. अंतरावर करावी. एका चुडामध्ये दोन ते तीन रोपे लावावीत. पहिल्या ३० दिवसांपर्यंत पाण्याची पातळी २.५ ते ५ सें.मी. पर्यंत नियंत्रित करावी.<br>• भात रोपवाटिकेस पेरणी नंतर १५ दिवसांनी बेणणी करून युरिया खताची दुसरी मात्रा १ किलो |

| | | |
|---|---|---|
| | | युरिया प्रति गुंठा क्षेत्राला देण्यात यावी. |
| **चवळी/ मोहरी** | वाढीची ते फुलोरा अवस्था | • हवामान अंदाजानुसार ढगाळ वातावरण संभवत असल्याने चवळी, मोहरी पिकामध्ये मावा इ. रसशोषक किडीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने मावा आणि त्यांची पिल्ले कोवळ्या शेंड्यावर पानाच्या खालच्या भागातील रस शोषून घेतात त्यामुळे झाडाची वाढ खुंटते तसेच किडीने बाहेर टाकलेल्या मधासारख्या चिकट द्रावणामुळे पानांजवळ काळ्या बुरशीची वाढ दिसून येते. मावाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १२ मि. ली. किंवा लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **आंबा** | फुलोरा ते फळधारणा (मोहरी) अवस्था | • दिनांक २२ ते २३ जानेवारी, २०२२ दरम्यान ढगाळ वातावरण राहून हलक्या पाऊसाची शक्यता असल्याने मोहोर ते फळधारणा अवस्थेतील **आंब्यावर भुरी आणि करपा रोगाचा** प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून भुरी रोगामुळे मोहोरावर पांढऱ्या बुरशीची वाढ दिसून येते. बुरशीची मुळे अन्नरस शोषून घेतल्याने मोहोर वाळून गळून जातो. लहान फळांच्या देठावर हि बुरशीची वाढ होवून फळे गळतात. तर करपा रोगामुळे मोहोर तांबूस होवून वाळतो तसेच फुलगळ होते. लहान फळांवर काळे डाग पडून फळांची गळ होते. सदर कालावधीत पाऊस झाल्यास भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी आणि करपा रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बेन्डाझीम १२ टक्के + मॅन्कोझेब ६३ टक्के या संयुक्त बुरशीनाशकाची १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. एकाच बुरशीनाशकाची सलग फवारणी घेणे टाळावे.<br>• सद्य हवामान मोहोर अवस्थेतील आंब्यावर तुडतुड्यांचा वाढीसाठी पोषक असून, तुडतुडे मोहोरातील, कोवळ्या फळातील रस शोषून घेतल्यामुळे मोहोराची गळ होते यासोबतच तुडतुडे मधासारखा चिकट पदार्थ शरीरावाटे बाहेर टाकतात आणि तो पानांवर पडल्यामुळे त्यावर काळी बुरशी वाढते. तुडतुड्यांनी आर्थिक नुकसानीची पातळी (मोहोर अवस्था ->५ तुडतुडे प्रती मोहोर) ओलांडली असल्यास कीटकनाशकाची फवारणी करण्यात यावी. यासाठी मोहोर फुलण्यापूर्वीच्या अवस्थेत इमिडाक्लोप्रीड १७.८ टक्के प्रवाही ३ मि.ली. किंवा ब्युप्रोफेझीन २५ टक्के प्रवाही २० मि.ली. प्रति १० लिटर पाणी आणि मोहोर फुलल्यानंतर कणी अवस्थेत असताना थायोमेथोक्झाम २५ टक्के दाणेदार १ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी पाऊसाची उघडीप पाहून करावी.<br>• टीप: मोहोर नुकताच फुलत असताना ते फळधारणा होईपर्यंत किटकनाशकाची फवारणी शक्यतो टाळावी. फवारणी करणे गरजेची असल्यास बागेतील परागीकरण करणाऱ्या कीटकांवर होणारा परिणाम टाळण्यासाठी परागीकरणाचा कालावधी वगळून (सकाळी ०९.०० ते १२.००) फवारणी करावी. किटकनाशक किंवा बुरशीनाशकाची फवारणी शक्यतो सकाळी किवा संध्याकाळच्या वेळेस करावी.<br>• या अगोदर फवारणी घेतली असल्यास किड व रोगाच्या प्रादुर्भावाकडे झाडाचे निरीक्षण करावे आणि प्रादुर्भाव दिसून येत असल्यास उपाय योजना कराव्यात.<br>• आंब्यामधील फळधारणा वाढविण्यासाठी मोहोर फुललेल्या अवस्थेत असताना सकाळी ९ ते १२ वा. दरम्यान मोहोर हलका हलवून घ्यावा. तसेच फळधारणा झालेल्या झाडावरील मोहोरातील नर फुले सुकलेल्या अवस्थेत असतात यासाठी मोहोर दुपारच्या वेळेस कडक उन्हामध्ये झाडून घ्यावा आणि त्यानंतरच झाडावर फवारणी करावी.<br>• किमान तापमानात होणारी घट यामुळे आंब्याच्या फळे धरलेल्या फांद्यावर पुन्हा नवीन मोहोर येण्याची शक्यता असते. त्यामुळे अन्नाचे वहन नवीन मोहोराकडे होवून जुन्या मोहोराला असलेली वाटाणा/ गोटी आकाराच्या फळांची गळ दिसून येते. यासाठी मोहोर अवस्थेत असलेल्या आंबा झाडावर पुर्नमोहोर प्रक्रिया टाळणेसाठी जिब्रेलिक ॲसिड या संजीवकाची ५० पी.पी.एम म्हणजेच १ ग्रॅम प्रती २० लिटर पाण्यात मिसळून स्वतंत्र फवारणी झाडाला पुरेसा मोहोर आला असल्याची खात्री झाल्यानंतरच झाडावरील मोहोर पूर्ण उमललेला असताना आणि नंतर पुन्हा मोहरीच्या आकाराची फळे झाल्यावर करावी. जिब्रेलिक ॲसिडची पावडर पाण्यात अविद्राव्य असल्याने प्रथम |

| | | |
|---|---|---|
| | | ती थोड्या अल्कोहोल मध्ये विरघळून नंतर पाण्यात मिसळावी. |
| **काजू** | मोहोर ते फळधारणा अवस्था | • दिनांक २२ ते २३ जानेवारी, २०२२ दरम्यान ढगाळ पावसाळी वातावरण राहण्याची शक्यता असल्याने मोहोर/फळधारणा अवस्थेतील काजूवर ढेकण्या (टी मोस्कीटो बग) तसेच फुलकिडीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून ढेकण्या किड पालवी/ मोहोरातील/फळातील रस शोषून घेते तसेच पिल्ले आणि प्रौढ यांची लाळ ही फायटोटॉक्सिक असल्याने पालवी/मोहोर सुकून जातो, मोहोराच्या दांड्यावर काळे डाग दिसून येतात. किडीच्या नियंत्रणासाठी मोहोर अवस्थेत असताना प्रोफेनोफॉस ५० टक्के प्रवाही १० मि.ली. आणि फळधारणा अवस्थेत लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा असिटामिप्रीड २० टक्के एसपी ५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यातून फवारणी पाऊसाची उघडीप पाहून तसेच पानांच्या खालून आणि वरून व्यवस्थित बसेल अशी करावी. फवारणी शक्यतो सकाळी १०.०० पूर्वी किंवा संध्याकाळी ४.०० नंतर फवारणी करावी. (सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाही). या अगोदर फवारणी घेतली असल्यास किड व रोगाच्या प्रादुर्भावाकडे झाडाचे निरीक्षण करावे आणि प्रादुर्भाव दिसून येत असल्यास उपाय योजना कराव्यात. |
| **सुपारी** | फळधारणा | • दिनांक २२ ते २३ जानेवारी, २०२२ दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता वर्तविण्यात आली असल्याने काढणी केलेली सुपारी सुरक्षित ठिकाणी वाळवावी. |
| **वांगी** | वाढीची ते फळधारणा अवस्था | • वांगी पिकामध्ये जीवाणूजन्य तसेच बुरशीजन्य मर रोगाचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असते. जीवाणूजन्य मर रोगामध्ये रोगग्रस्त रोपे मुळांसहित उपटून स्वच्छ करून खोडाजवळ आडवा काप देवून कापलेला भाग लगेचच स्वच्छ पाणी भरलेल्या पारदर्शक ग्लासामध्ये धरल्यास दुधाळ रंगाचा स्त्राव बाहेर येताना दिसतो. तर बुरशीजन्य मर रोगामुळे जमिनीखालील खोडाचा भाग वाळून तपकिरी रंगाचा होतो तर मुळे कुजतात. जीवाणूजन्य मर रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास रोपे त्वरित उपटून नष्ट करावीत आणि तीन वर्षापर्यंत वांगी कुळातील पिके त्याच शेतात न घेता पिक फेरपालट करावी. सुवर्ण प्रतिभा आणि कोकण प्रभा या रोग प्रतिकारक जातींची लागवड करावी. बुरशीजन्य मर रोगाच्या नियंत्रणासाठी ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशकाची ५ ग्रॅम प्रती लिटर पाणी या प्रमाणे द्रावण तयार करून रोपांच्या बुंध्याशी आळवणी करावी. |
| **हळद** | पक्वता | • हळदीचे गड्डे पक्के झाल्यावर हळदीची पाने पिवळी पडून सुकू लागतात आणि जमिनीवर लोळतात. पक्व हळद पिकाची काढणी करावी. कंद व हळकुंडे वेगवेगळी करून हळद शिजवून ताडपत्रीवर सिमेंट कॉक्रीटच्या खळ्यावर वाळविण्यासाठी पसरून ठेवावी. हळद वाळविण्यासाठी १० ते १५ दिवसांचा कालावधी लागतो. दिनांक २२ ते २३ जानेवारी, २०२२ दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता वर्तविण्यात आली असल्याने शिजवलेली हळद सुरक्षित ठिकाणी वाळवावी. |
| **काळीमिरी** | पक्वता | • काळीमिरीच्या घोसातील १ ते २ दाणे पिवळे किंवा तांबडे लाल होताच मिरीची काढणी करावी व दुसऱ्या दिवशी मिरीचे दाणे घोसापासून वेगळे करून बांबूच्या करंडीत किंवा मलमलच्या कापडात भरून उकळत्या पाण्यात एक मिनिटे बुडवावेत व उन्हामध्ये ३ ते ४ दिवस चांगले वाळवावे. दिनांक २२ ते २३ जानेवारी, २०२२ दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता वर्तविण्यात आली असल्याने काळीमिरी सुरक्षित ठिकाणी वाळवावी. |
| **शेळीपालन** | - | • किमान तापमानात घट संभवत असल्याने रात्रीच्या वेळेस शेळ्या, करडाचे थंडीपासून संरक्षणाकरिता गरजेनुसार विजेचे बल्ब लावावेत. |
| **कुकुटपालन** | - | • किमान तापमानात घट संभवत असल्याने रात्रीच्या वेळेस कोंबड्यांच्या शेड मध्ये गरजेनुसार विजेचे बल्ब लावावेत आणि शेडभोवती पडदे गुंडाळावे. |

• ट्रायकोडर्मा हे जैविक बुरशीनाशक डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठाच्या प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र, कर्जत येथे उपलब्ध असून अधिक माहितीसाठी ९४०५९३८५१४ या नंबर वर संपर्क साधावा.

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.

अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र, कृषी विज्ञान केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.